# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

आयएसओ ९००१:२००८ मानांकित संस्था

## प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९

## महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश

१३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे – ४११ ००७

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

वेबसाईट : www.mcaer.org
: maha-agriadmission.in

दूरध्वनी : (०२०) २५५३७६८८.
: (०२०) २५५३७२५७

फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.

दि. ३० जुलै,२०१८ रोजी प्रकाशित.

(प्रवेश प्रक्रियेविषयक कायदेशीर बाबी उद्भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.)

## महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे-४११ ००७.
**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

| पदाधिकारी | नाव | दूरध्वनी क्रमांक | फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | महामहिम सी. विद्यासागर राव | ०२२-२३६३२६६० | ०२२-२३६३३२७२ |
| कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रति-कुलपती व अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | मा. श्री. चंद्रकांत पाटील | ०२२-२२०२५०१४ | ०२२-२२०२४८७३ |
| महासंचालक | श्री. सचिन्द्र प्रताप सिंह | ०२०-२५५३७२५७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (शिक्षण) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| संचालक (व़िस्तार शिक्षण व साधनसामुग्री विकास) | डॉ. विठ्ठल शिर्के | ०२०- २५५३४५७७ | ०२०- २५५३३७६४ |
| संचालक (संशोधन) | डॉ. हरिहर कौसडीकर | ०२०- २५५३७६८८ | ०२०- २५५३७६८८ |
| सहसंचालक (प्रशासन) | श्री. गणेश घोरपडे | ०२०-२५५३१२०८ | ०२०-२५५३३७६४ |
| सहसंचालक (वित्त) | श्री. गणेश पाटील | ०२०- २५५३२७२६ | ०२०- २५५३३७६४ |
| **संकेतस्थळे:** www.mcaer.org & maha-agriadmission.in, **email:** mcaer@rediffmail.com,edn_mcaer@rediffmail.com | | | |

### महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ४१३ ७२२ जि. अहमदनगर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. क. प. विश्वनाथा | ०२४२६-२४३२०८ | ०२४२६-२४३३०२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. अ. ल. फरांदे | ०२४२६-२४३२२७ | ०२४२६-२४३२२७ |
| ३ | कुलसचिव | श्री. दि. ज्ञा. पवार | ०२४२६-२४३२१६ | ०२४२६-२४३२१६ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. वि. आ. दाभाडे | ०२४२६-२४३२१५ | ०२४२६-२४३२१६ |
| **संकेतस्थळ:** mpkv.mah.nic.in | | | **email:** dracdmpkv2013@rediffmail.com | |

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला ४४४ १०४

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. वि. म. भाले | ०७२४-२२५८३६५ | ०७२४-२२५८२१९ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. वि. म. भाले | ०७२४-२२५८०९३ | ०७२४-२२५८०९३ |
| ३ | कुलसचिव | डॉ. प्र. रा. कडू | ०७२४-२२५८३७२ | ०७२४-२२५८३७२ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. श्री. के. अहेरकर | ०७२४-२२५८३४८ | ०७२४-२२५८३४८ |
| **संकेतस्थळ:** www.pdkv.ac.in | | | **email :-** dyracad@pdkv.ac.in | |

### वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी ४३१ ४०२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. अ. श्री. ढवण | ०२४५२-२२३००२ | ०२४५२-२२३५८२ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. वि. द. पाटील | ०२४५२-२२२६८७ | ०२४५२-२२२६८७ |
| ३ | कुलसचिव | डॉ. ग. कों . लोंढे | ०२४५२-२२९७५५ | ०२४५२-२२९७५५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. ग. आ. भालेराव | ०२४५२-२२७९०० | ०२४५२-२२७९०० |
| **संकेतस्थळ:** mkv2.mah.nic.in | | | **email:** reg_mau@rediffmail.com | |

### डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली ४१५ ७१२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. तपस भट्टाचार्य | ०२३५८-२८२०६४ | ०२३५८-२८२०७४ |
| २ | शिक्षण संचालक | डॉ. स. सो. नारखेडे | ०२३५८-२८४३०८ | ०२३५८-२८४३०८ |
| ३ | कुलसचिव | डॉ. के. ज. चौधरी | ०२३५८-२८२०६५ | ०२३५८-२८३०६५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. अ. स. पवार | ०२३५८-२८२४११<br>विस्तार १२५ | ०२३५८-२८३९६३ |
| **संकेतस्थळ:** www.dbskkv.org | | | **email:** regrdbskkv@rediffmail.com | |

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-४११ ००७.**

---

## प्रवेश माहिती पुस्तिका २०१८-१९

### महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठामधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश

**प्रस्तावना :**

**१.१** महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (कृषी परिषद) ही महाराष्ट्र कृषी विद्यापीठे, अधिनियम, १९८३ चे कलम १२ अंतर्गत स्थापन झालेली वैधानिक संस्था आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्याचे कार्य कृषी परिषदेमार्फत करण्यात येते. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १५१७/प्र.क्र.६०/७अे, दि.३०/५/२०१८ विचारात घेऊन चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये कृषी परिषदेकडून समन्वयाचे काम करण्यात येत आहे.

**१.२** कृषी परिषदेच्या ९६ व्या बैठकीतील ठराव क्र. ०४/९६/२०१८ विचारात घेऊन राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

**१.३** शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ अन्वये शासनाने, कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर शासन निर्णय कृषी परिषदेच्या संकेस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**१.४** कृषी परिषदेच्या दि.२२/०५/२०१३ रोजी संपन्न झालेल्या ८८ व्या बैठकीतील विषय क्र.१२ अन्वये कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. ('केटीपीएल'), पुणे यांच्यावर सामायिक प्रवेश प्रक्रिया **'ऑनलाईन पध्दती'**ने राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## १.५ कृषी विद्यापीठांचे कार्यक्षेत्र :

| अ. क्र. | कृषी विद्यापीठाचे नाव | कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | **म**हात्मा **फु**ले **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>राहुरी-४१३ ७२२, जि. अहमदनगर<br>**(मफुकृवि - राहुरी)** | **अहमदनगर**, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर |
| २ | **डॉ. पं**जाबराव **दे**शमुख **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>अकोला-४४४ १०४.<br>**(डॉ.पंदेकृवि - अकोला)** | **अकोला,** अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर. |
| ३ | **व**संतराव **ना**ईक मराठवाडा **कृ**षी **वि**द्यापीठ,<br>परभणी-४३१ ४०२.<br>**(वनामकृवि - परभणी)** | **परभणी,** हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड, जालना व औरंगाबाद. |
| ४ | **डॉ. बा**ळासाहेब **सा**वंत **कों**कण **कृ**षी **वि**द्यापीठ, दापोली-४१५ ७१२.<br>जि. रत्नागिरी<br>**(डॉ. बासाकोकृवि - दापोली)** | **रत्नागिरी,** सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर. |

## १.६ व्याख्या :

### १.६.१ कृषी विद्यापीठ कोटा ['U' Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे, आणि महाराष्ट्रातील संबंधित कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून पात्रता (पदवी) परीक्षा उत्तीर्ण आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'कृषी विद्यापीठ कोटा' ['U' Quota]** असे संबोधण्यात यावे.

### १.६.२. महाराष्ट्र कोटा ['M' Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र

राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'महाराष्ट्र कोटा' ['M' Quota]** असे संबोधण्यात यावे. यास्तव कृषी विद्यापीठ कोटयातील उमेदवार महाराष्ट्र कोटयाकरितासुध्दा पात्र आहेत.

**१.६.३ राज्याबाहेरील उमेदवारांसाठी कोटा ['O.S.' Quota]**

**प्रवेश घेण्यापूर्वी लगतच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या उमेदवारांनी व ज्यांच्या आई- वडिलांनी महाराष्ट्रात निवास केला नसेल, अशा व्यक्ती** आणि ज्या व्यक्तींनी महाराष्ट्राव्यतिरिक्त देशातील बाहेरील राज्यांचे अधिवास प्रमाणपत्र धारण केलेले असेल, अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'राज्याबाहेरील उमेदवारांसाठी कोटा' [Other State- O.S. Quota]** असे संबोधण्यात यावे.

**१.६.४ जागेवर प्रवेश [Spot Admission]**

नियोजित ऑनलाईन प्रवेश फे-या संपल्यानंतर रिक्त झालेल्या / असलेल्या जागांवर प्रवेश मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालय / संस्थेच्या ठिकाणी उमेदवाराने प्रत्यक्ष उपस्थित राहणे आणि उपस्थित उमेदवारांमधून आरक्षण व गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याच्या प्रक्रियेस **'जागेवर प्रवेश' [Spot Admission]** असे संबोधण्यात यावे. **जागेवर प्रवेशासाठीच्या प्रक्रियेच्यावेळी अनुपस्थित असलेला उमेदवार 'जागेवर प्रवेशा'साठी पात्र ठरणार नाही.**

**१.६.५** ''प्रवेश अर्ज'' याचा अर्थ, उमेदवाराने प्रवेशाकरिता ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा विहित नमुना, असा आहे;

**१.६.६** ''ऑनलाईन प्रवेश वाटप फेरी'' याचा अर्थ, उमेदवाराची गुणवत्ता, प्रवर्ग, पसंतीक्रम (विकल्प) विचारात घेऊन संगणकप्रणालीद्वारे प्रवेशाचे वाटप करण्याची कॅपअंतर्गत प्रक्रिया, असा आहे.

## २. संस्था व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा तपशील :

परिच्छेद २.१ येथे नमूद करण्यात आलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ ('यु' कोटा) व महाराष्ट्र ('एम्' कोटा) कोटयाकरिता इच्छुक उमेदवारांनी **एकच प्रवेश अर्ज दाखल करावा.**

पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्णवेळ अभ्यासक्रम असून अभ्यासक्रमाचे व परीक्षेचे माध्यम इंग्रजी राहील.

## २.१ विद्याशाखा, पदव्युत्तर अभ्यासक्रम, कालावधी, गुण भार (Credit load) आणि पात्रता :

### २.१.१ पदव्युत्तर अभ्यासक्रम

पदव्युत्तर प्रवेश हा पूर्णतः गुणवत्ता आधारित असेल. महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळ यांच्याद्वारे चालू शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या संबंधित विद्याशाखेच्या सामायिक प्रवेश परीक्षेचे गुण व अर्हता पदवीचे गुण यांचे प्रमाण अनुक्रमे ७०:३० असे राहील. **अशाप्रकारे एकत्रित किमान ५५ टक्के (१० बिंदु मापननुसार किमान ५.५) गुण प्रवेशाकरिता अनिवार्य आहेत.**

| अ. क्र. | विद्याशाखा | कालावधी | श्रेयांक भार | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | एम्.एस्सी. (कृषी) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी.एस्सी. (कृषी) / बी.बी.ए. (कृषी) / बी.एस्सी. (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) /बी. बी. एम्. (कृषी) / बी.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) / बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी)* / बी. एस्सी. (उद्यानविद्या) / बी. एस्सी. (वनशास्त्र) / बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान) ** / बी.एस्सी. (ऑनर्स) गृह विज्ञान*** किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली कृषी विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| २ | एम्.एस्सी. (उद्यानविद्या) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी.एस्सी. (कृषी) / बी. एस्सी. (उद्यानविद्या) / बी. एस्सी. (वनशास्त्र) किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली उद्यानविद्या विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ३ | एम्.एस्सी. (वनशास्त्र) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी.एस्सी. (कृषी) / बी. एस्सी. (उद्यानविद्या) / बी. एस्सी. (वनशास्त्र) किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली वनशास्त्र विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ४ | एम्.एफ्.एस्सी. (मत्स्य विज्ञान) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी.एफ्.एस्सी. किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली मत्स्यशास्त्र विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ. क्र. | विद्याशाखा | कालावधी | श्रेयांक भार | पात्रता |
|---|---|---|---|---|
| ५ | एम्.टेक. (अन्न तंत्रज्ञान) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी. टेक्. (अन्नतंत्र) किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली अन्न तंत्रज्ञान विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ६ | एम्.एस्सी. (कृषी जैव तंत्रज्ञान) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी.एस्सी. (कृषी) / बी.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) / बी. एस्सी. (उद्यानविद्या) / बी. एस्सी. (वनशास्त्र) / बी.एफ्.एस्सी. / बी्. टेक्. (अन्नतंत्रज्ञान) किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली कृषी जैवतंत्रज्ञान विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ७ | एम्. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली कृषी अभियांत्रिकी विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ८ | एम्.एस्सी. (गृह विज्ञान) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी. एस्सी. (ऑनर्स) (गृह विज्ञान) किंवा चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली गृह विज्ञान विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ९ | एम्.बी.ए. (कृषी) | २ वर्षे (४ सत्रे) | ५० | बी.एस्सी. (कृषी) / बी.बी.ए. (कृषी) / बी.एस्सी. (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) /बी. बी. एम्. (कृषी) / बी.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) / बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी)/ बी. एस्सी. (उद्यानविद्या) / बी. एस्सी. (वनशास्त्र) / बी.एफ्.एस्सी. /बी्. टेक्. (अन्नतंत्रज्ञान) / बी.एस्सी. (ऑनर्स) गृह विज्ञान किंवा कृषीशी संबंधित विद्यापीठातील चार वर्षे कालावधीची समकक्ष पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली कृषी व्यवसाय व्यवस्थापन विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ. क्र. | विद्याशाखा | कालावधी | श्रेयांक भार | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १० | एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन)- विषयनिहाय प्रवेश पात्रता | | | |
| | १. फळे, भाजीपाला व फुलपिकांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | २ वर्षे (४ सत्रे) | ५५ | बी.एस्सी. (कृषी) / बी. एस्सी. (उद्यानविद्या) ही पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| | २. मत्स्य, मांस, कुक्कुट व सागरी उत्पादनांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | | | बी.एस्सी. (कृषी) / बी.एफ्.एस्सी. / बी. व्ही. एससी. ही पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| | ३. औषधी, सुगंधी, मसाले व वन पिकांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | | | बी.एस्सी. (कृषी) / बी. एस्सी. (उद्यानविद्या) / बी. एस्सी. (वनशास्त्र) / बी.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) ही पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| | ४. काढणी पश्चात अभियांत्रिकी | | | बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) / बी. टेक्. (अन्नतंत्र) / कृषी विद्यापीठाचे बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) / बी. एस्सी. (गृह विज्ञान) ही पदवी उत्तीर्ण, आणि महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता घेतलेली एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) विद्याशाखेतील सामायिक प्रवेश परीक्षा. |
| | ५. अन्नधान्य व बिजांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | | | |

* बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) पदवीधारक उमेदवार फक्त 'कृषी हवामानशास्त्र' या विषयाच्या प्रवेशासाठी पात्र असतील.

** बी. टेक्. (अन्न तंत्रज्ञान) पदवीधारक उमेदवार फक्त 'अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान' या विषयाच्या प्रवेशासाठी पात्र असतील.

*** बी. एस्सी. (ऑनर्स) (गृह विज्ञान) पदवीधारक उमेदवार फक्त 'कृषी विस्तार शिक्षण' या विषयाच्या प्रवेशासाठी पात्र असतील.

### २.१.२ इतर निकष-

(१) उमेदवार हा महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी घेतलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत असावा व त्याने किमान ५.५ सीजीपीए गुणवत्तेने पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

(२) ४ (बिंदू मापन) १० (बिंदू मापन) मध्ये रुपांतरीत करण्यासाठी खालील प्रमाणे सूत्र वापरण्यात येईल.

वाय = १.५ + २ एक्स, जेथे एक्स = २ ते ३.५ आणि

वाय = ८.५ + ३ (एक्स-३.५), जेथे एक्स = ३.५१ ते ४.००

जेथे, वाय = १० पॉईन्ट स्केल मध्ये गुणाधिभार आणि

एक्स = ४.०० पॉईन्ट स्केल मध्ये गुणाधिभार

## २.२ पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता

### *२.२.१ ओ) एम्.एस्सी. (कृषी)*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | | | | डॉ. पंदेकृवि, अकोला | | | वनामकृवि, परभणी | | | डॉ. बासा-कोकृवि दापोली | एकूण |
| | | पुणे | पीजी आय राहुरी | कोल्हापूर | धुळे | पीजीआय अकोला | श्रीशिकृम अमरावती | कृ.म. नागपूर | परभणी | लातूर | बदनापूर | | |
| १. | कृषीविद्या | ६ | १५ | ६ | ४ | २४ | - | १२ | १३ | १२ | ६ | ८ | १०६ |
| २. | कृषी वनस्पतीशास्त्र | | | | | | | | | | | | |
| | अ) अनुवंश व रोप पैदासशास्त्र | ६ | १५ | ६ | ४ | १३ | - | ८ | ७ | १२ | ६ | ६ | ८३ |
| | ब) रोप शरीरशास्त्र | - | ६ | - | - | ६ | - | ५ | ६ | - | -- | ३ | २६ |
| | क) बीज तंत्रज्ञान | - | ९ | - | | ५ | - | - | २ | - | -- | - | १६ |
| ३. | कृषी अर्थशास्त्र | - | १५ | ६ | - | १८ | ९ | १३ | १२ | १२ | -- | ८ | ९३ |
| ४. | विस्तार शिक्षण* | ६ | १५ | ६ | - | १८ | ९ | १३ | १२ | १२ | -- | ८ | ९९ |
| ५. | पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र | | | | | | | | | | | | |
| | अ) पशुसंवर्धन | ६ | ९ | - | ४ | ९ | - | ८ | ६ | ६ | -- | ४ | ५२ |
| | ब) दुग्धशास्त्र | - | ६ | ६ | - | ९ | - | ८ | ६ | ६ | -- | ४ | ४५ |
| ६. | कृषी कीटकशास्त्र | ६ | १५ | ६ | ४ | २१ | - | १२ | १३ | १२ | ६ | ८ | १०३ |
| ७. | वनस्पती रोगशास्त्र | ६ | १५ | - | ४ | २१ | - | १२ | १३ | १२ | ६ | ६ | ९५ |
| ८. | कृषी सुक्ष्म जीवशास्त्र | ६ | ६ | ६ | - | - | - | - | - | - | | - | १८ |
| ९. | मृदशास्त्र व कृषी रसायन शास्त्र | | | | | | | | | | | | |
| | अ) मृदशास्त्र व कृषी रसायनशास्त्र | ६ | १५ | ६ | ४ | १८ | - | १२ | १३ | १२ | ६ | ८ | १०० |
| | ब) भू साधन व्यवस्थापन | - | - | - | - | ४ | - | - | - | - | - | - | ४ |
| १०. | जैवरसायनशास्त्र | - | ९ | - | - | - | - | - | - | - | | - | ९ |
| ११. | अन्न तंत्रज्ञान** | - | ९ | - | - | - | - | - | - | - | -- | - | ९ |
| १२. | सिंचन जलव्यवस्थापन | - | ९ | - | - | - | - | - | - | - | -- | - | ९ |

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | | | | डॉ. पंदेकृवि, अकोला | | | वनामकृवि, परभणी | | | डॉ. बासा-कोकृवि दापोली | एकूण |
| | | पुणे | पीजी आय राहुरी | कोल्हापूर | धुळे | पीजीआय अकोला | श्रीशिकृम अमरावती | कृ.म. नागपूर | परभणी | लातूर | बदनापूर | | |
| १३. | कृषी हवामानशास्त्र*** | ६ | - | - | - | - | - | - | १२ | - | -- | - | १८ |
| | **एकूण** | **५४** | **१६८** | **४८** | **२४** | **१६६** | **१८** | **१०३** | **११५** | **९६** | **३०** | **६३** | **८८५** |

* बी. एस्‌सी.(ऑनर्स) गृहविज्ञान पदवीधारकसुध्दा पात्र आहेत.

** बी.टेक. (अन्नशास्त्र) पदवीधारकसुध्दा पात्र आहेत.

*** बी.टेक. (कृषी अभियांत्रिकी) पदवीधारकसुध्दा पात्र आहेत.

## *बी) एम्‌.एस्‌सी. (उद्यानविद्या)*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | | | | डॉ.पंदेकृवि, अकोला | | वनामकृवि, परभणी | | | डॉ. बासा कोकृवि दापोली | एकूण |
| | | पुणे | राहुरी | कोल्हापूर | धुळे | अकोला | नागपूर | परभणी | लातूर | बदनापूर | | |
| १. | फळशास्त्र | - | ६ | -- | ४ | १४ | - | ८ | ६ | ६ | ८ | ५२ |
| २. | भाजीपाला शास्त्र | - | ६ | ६ | | १४ | - | ८ | ६ | -- | ८ | ४८ |
| ३. | फुलशेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन | ६ | - | -- | | - | ९ | ३ | - | -- | ८ | २६ |
| ४. | मसाले, औषधी आणि सुगंधी पिकांचे रोपण | - | - | - | - | - | - | - | - | - | ८ | ८ |
| | **एकूण** | **६** | **१२** | **६** | **४** | **२८** | **९** | **१९** | **१२** | **६** | **३२** | **१३४** |

## *सी) एम्‌.एस्‌सी. (वनशास्त्र)*

| अ. | विषय | प्रवेश क्षमता | | |
|---|---|---|---|---|
| | | डॉ. पंदेकृवि अकोला | डॉ.बासा-कोकृवि, दापोली | एकूण |
| १. | वनीय कुरण आणि वनशेती | ३ | २ | ५ |
| २. | वन्यजीवशास्त्र व वृक्ष सुधारणा | ३ | २ | ५ |
| ३. | नैसर्गिक साधन व्यवस्थापन | ३ | २ | ५ |
| ४. | वन उत्पादन व उपयोगिता | ५ | १ | ६ |
| | **एकूण** | **१४** | **७** | **२१** |

### डी) एम्.एफ्.एस्सी. (मत्स्यशास्त्र)

| अ.क्र. | विषय | डॉ.बासाकोकृवि, दापोली |
|---|---|---|
| १. | मत्स्य साधन व्यवस्थापन | ३ |
| २. | मत्स्य जैवतंत्रज्ञान | ३ |
| ३. | मत्स्यशेती | ३ |
| ४. | मत्स्य पोषण व खाद्य तंत्रज्ञान | ३ |
| ५. | जलीय पर्यावरण व्यवस्थापन | २ |
| ६. | मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान | ६ |
| ७. | मत्स्य अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | २ |
| ८. | मत्स्य अर्थशास्त्र | २ |
| ९. | मत्स्य विस्तार | ४ |
| | **एकूण** | **२८** |

### इ) एम्.टेक. (अन्न तंत्रज्ञान)

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | वनामकृवि, परभणी |
| १. | अन्न तंत्रज्ञान | १५ |

### एफ्) एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान)

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी लातूर | डॉ. बासाकोकृवि, दापोली | एकूण |
| १. | कृषी जैवतंत्रज्ञान | ८ | १२ | ८ | ४ | ३२ |

### जी) एम्. टेक्. (कृषी अभियांत्रिकी)

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ.पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ.बासाकोकृवि, दापोली | एकूण |
| १. | प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी | ४ | ५ | २ | ४ | १५ |
| २. | कृषी यंत्रे आणि शक्ती | - | ५ | २ | ४ | ११ |
| ३. | सिंचन व निचरा अभियांत्रिकी | ४ | ५ | २ | ४ | १५ |
| ४. | मृद व जलसंधारण अभियांत्रिकी | ४ | ५ | २ | ४ | १५ |
| ५. | अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत | - | ५ | - | ४ | ९ |

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ.पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ.बासाकोकृवि, दापोली | एकूण |
| ६. | कृषी रचना व पर्यावरण व्यवस्थापन | - | **५** | - | - | **५** |
| | **एकूण** | **१२** | **३०** | **८** | **२०** | **७०** |

## *एच्) एम्.एस्सी. (गृहविज्ञान)*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | वनामकृवि, परभणी |
| १. | गृह व्यवस्थापन | ४ |
| २. | अन्न व पोषण | ४ |
| ३. | बालसंगोपन व कौटुंबिक नाते | ४ |
| | **एकूण** | **१२** |

## *आय) एम्.बी. ए. (कृषी)*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | एकूण |
| | | पुणे | नागपूर | लातूर | |
| १. | कृषी व्यवसाय व्यवस्थापन | ३० | ३० | ३५ | ९५ |

## *जे) एम्.एस्.सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन)*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | |
|---|---|---|---|---|
| | | डॉ.बासाकोकृवि, दापोली | | |
| | | रोहा | | |
| | | केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे | पुरस्कृत उमेदवारांसाठी | एकूण |
| १. | फळे, भाजीपाला व फुलपिकांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | ४ | ३ | ७ |
| २. | मत्स्य, मांस, कुक्कुट व सागरी उत्पादनांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | ४ | ३ | ७ |
| ३. | काढणी पश्चात अभियांत्रिकी | ३ | २ | ५ |
| ४. | औषधी, सुगंधी, मसाले व वन पिकांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | ४ | २ | ६ |
| ५. | अन्नधान्य व बिजांचे काढणी पश्चात व्यवस्थापन | ३ | २ | ५ |
| | **एकूण** | **१८** | **१२** | **३०** |

(पुरस्कृत उमेदवार म्हणजे संस्था/ संघटना / उद्योग / विद्यापीठ / अशासकीय संघटना / स्वतः यांच्याकडून अर्थसहाय्याकरिता पुरस्कत. अशा उमेदवारांना कोणत्याही प्रकारच्या शुल्काची सवलत देय नाही.)

**सूचना :** पुरस्कृत पात्र उमेदवारांनी पहिल्या प्रवेश फेरीच्या पहिल्या दिवशी काढणी पश्चात व्यवस्थापन संस्था, किल्ला-रोहा, जि.रायगड येथील कार्यालयात हजर राहून 'प्रथम येणा-यास प्राधान्य' या धर्तीवर प्रवेश देण्यात येतील.

टीपः-

१. पदव्युत्तर अभ्यासक्रमातील [राहुरी व अकोला येथील एम्.बी.ए.(कृषी) व राहुरी, अकोला व दापोली येथील एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) वगळता] एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली मार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे अखिल भारतीय गुणवत्तेनुसार भरण्यासाठी आरक्षित आहेत. (यामध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त जागा समाविष्ट आहेत.)

२. ज्या घटक / अनुदानित महाविद्यालयांना भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे ॲक्रीडीटेशन प्राप्त आहे, अशाच महाविद्यालयांसाठी सदरची तरतूद आहे.

३. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडील प्रतीक्षा यादी पूर्ण झाल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास, याविषयी संबंधित विद्यापीठे राज्यस्तरावर जाहिरात देऊन विद्यापीठस्तरावर नियमानुसार प्रवेश प्रक्रिया राबवतील.

### २.२.२ पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेचा विद्यापीठनिहाय गोषवारा.

| अ. क्र. | विद्याशाखा | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ. बासाकोकृवि, दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एम्.एस्सी. (कृषी) | २९४ | २८७ | २४१ | ६३ | ८८५ |
| २. | एम्.एस्सी. (उद्यानविद्या) | २८ | ३७ | ३७ | ३२ | १३४ |
| ३. | एम्.एस्सी. (वनशास्त्र) | -- | १४ | -- | ७ | २१ |
| ४. | एम्.एफ्.एस्सी. (मत्स्यशास्त्र) | -- | -- | -- | २८ | २८ |
| ५. | एम्. टेक्. (अन्न तंत्रज्ञान) | -- | -- | १५ | -- | १५ |
| ६. | एम्.एस्सी. (कृषी जैव-तंत्रज्ञान) | ८ | १२ | ८ | ४ | ३२ |
| ७. | एम्. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) | १२ | ३० | ८ | २० | ७० |
| ८. | एम्.एस्सी. (ऑनर्स) (गृहविज्ञान) | -- | -- | १२ | -- | १२ |
| ९. | एम्.बी.ए. (कृषी) | ३० | ३० | ३५ | -- | ९५ |
| १०. | एम्.एस्.सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) | -- | -- | -- | ३० | ३० |
| | **एकूण** | **३७२** | **४१०** | **३५६** | **१८४** | **१३२२** |

टिपः-

- डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला (डॉ.पंदेकृवि) अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयापैकी एक जागा डॉ.पंदेकृवि, अकोला या कृषी विद्यापीठातील सेवांतर्गत उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

- तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी (वनामकृवि) अंतर्गत एम.एससी. (कृषी) (जैवतंत्र विषयासह) साठी ५ जागा, एम. टेक. (कृषी अभियांत्रिकी), एम.टेक. (अन्नतंत्र) आणि एम. एससी. (गृहविज्ञान) या अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी १ जागा वनामकृवि, परभणी या कृषी विद्यापीठातील सेवांतर्गत उमेदवारांसाठी राखीव आहेत.
- तथापि, यापैकी जागा रिक्त राहिल्यास त्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर संबंधित महाविद्यालयस्तरावर गुणवत्ता यादीतून भरण्यात येतील.

## ३. उमेदवारांसाठी सूचना :

३.१ **प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.**

३.२ (i) प्रत्येक अर्जदाराने **फक्त एकच प्रवेश अर्ज** 'केटीपीएल'च्या **'maha-agriadmission.in'** या संकेतस्थळावर **'ऑन लाईन'** पध्दतीने भरावा. **उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज संकेतस्थळावर दाखल केल्यास शेवटचा दाखल केलेला प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.**

(ii) **प्रवेश अर्जाची प्रत** किंवा **इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा हातबटवडयाने कृषी परिषद, कृषी विद्यापीठ किंवा मे. केटीपीएल, पुणे यापैकी कोठेही पाठवू नयेत.**

(iii) **संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.** मे. केटीपीएल, पुणे यांच्या अधिकृत केंद्रांवर एक कागदपत्र स्कॅन केल्यास त्यासाठी रू.५/- शुल्क आकारण्यात येईल. अशा अधिकृत केंद्रांची यादी **'maha-agriadmission.in'** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(iv) **खुल्या उमेदवारांसाठी तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व उमेदवारांसाठी रु.१५००/- तर महाराष्ट्रातील आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.७५०/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

३.३ **उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून पुढील क्रमाने त्याच्या लॉग-इनद्वारे संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

(अे) पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणी पत्रक.

(बी) (i) ज्या महाविद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे, ते महाविद्यालय सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी **(महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठे वगळून)** प्रवेश घेतला असेल त्या महाविद्यालयाचे अधिकृत (Bonafide) प्रमाणपत्र.

(ii) भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे बोनाफाईड प्रमाणपत्र.

(iii) महाराष्ट्र राज्याबाहेरील (Other State) उमेदवारांना महाविद्यालय सोडल्याचा दाखला (College Leaving Certificate) सादर करता येत नसेल, तर अशावेळेस त्या महाविद्यालयाकडील स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate).

(iv) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या उमेदवाराने प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पुनश्च अर्ज केल्यास, **चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या संबंधित महाविद्यालयाचे 'बोनाफाईड प्रमाणपत्र'.**

(v) अशा उमेदवारास प्रवेश दिल्यास त्यास/तीस महाविद्यालय सोडल्याचा दाखला / स्थलांतराचे प्रमाणपत्र तीन महिन्यांच्या आंत सादर करणे आवश्यक आहे. सदर दाखला विहित मुदतीत सादर न केल्यास त्याचा/तिचा प्रवेश रद्द होऊ शकेल.

(vi) राज्याबाहेरील काही कृषी विद्यापीठांमध्ये महाविद्यालय सोडल्याचा दाखला देण्यात येत नाही, मात्र प्रवेश मिळाल्यानंतर प्रवेशित महाविद्यालयाकडे असा दाखला परस्पर पाठविण्याची कार्यपध्दती आहे. अशाप्रकरणी संबंधित कृषी विद्यापीठाच्या कुलसचिव / अधिष्ठाता यांचे तशा आशयाचे पत्र.

(सी) (i) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.

(ii) बाहेरील राज्यातील उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / रहिवास व जन्मदाखला.

(डी) **सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ या वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. या प्रमाणपत्राचा नमुना

**<u>परिशिष्ट 'अे'</u>** येथे जोडला आहे. उमेदवार किंवा त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे शेतजमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीवरील शेतीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे, असे या प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे आवश्यक आहे **किंवा तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(इ) राज्यातील **सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(एफ) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ११२३४-४८/२०१७ संदर्भात दिलेल्या आदेशास अनुसरून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या उमेदवारांचे जात वैधता प्रमाणपत्र. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास, सदर प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती.

(जी) **विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड , इतर मागासवर्गीय जाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी** सक्षम अधिकाऱ्याचे **दिनांक १ एप्रिल,२०१८ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले '<u>उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (Non Creamy Layer)' प्रमाणपत्र.</u>** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र नसल्यास, सदर प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती.

(वरील मुद्दा क्र. एफ व जी बाबत उमेदवारांना विशेष सूचनाः- 'जात वैधता प्रमाणपत्र' / 'उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत'चे प्रमाणपत्र मिळण्याकरिता, अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गातून ऑनलाईन प्रवेश फेरीद्वारे मिळणारा प्रवेश तात्पुरत्या स्वरूपाचा असेल. या उमेदवारांनी ज्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा महाविद्यालयाकडे दि. ३० ऑगस्ट,२०१८ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र / उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेशाचे वाटप आपोआप रद्द

समजून त्यांना खुल्या प्रवर्गात ग्राह्य धरण्यात येईल. यामुळे रिक्त होणारी जागा 'जागेवरील प्रवेश फेरी'द्वारे भरण्यात येईल.)

(एच्) महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी यांनी, उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याच्या/तिच्या वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची **शेतजमीन महाराष्ट्रातील** कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/ वीज /संरक्षण **प्रकल्पासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र.** / सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या **प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्याला द्यावयाचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

(आय्) पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीमध्ये प्राधिकृत समादेशकाने दिलेले **राष्ट्रीय छात्र सेना 'बी'** किंवा **'सी'** हवाई दल/ नौदल / स्थलसेना विभागाचे **प्रमाणपत्र.**

(जे) 'क्रीडा महोत्सव' / खेळ स्पर्धांमध्ये (आंतरमहाविद्यालयीनस्तरीय स्पर्धा वगळता) भाग घेणा-या उमेदवारांनी विद्यार्थी कल्याण अधिकारी / कृषी विद्यापीठाचे कुलगुरु / आयोजक विद्यापीठाच्या सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र.

**(के) पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीमध्ये राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा/ खेळ स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व** करणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले **सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र.**

(एल्) **पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीमध्ये** वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या **राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे संबंधित संघटनेचे प्रमाणपत्र**.

(एम्) अर्जदाराच्या आई / वडिलांचे **स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र**. स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांचा मुलगा / मुलगी यांना या प्रमाणपत्राचा फायदा मिळेल; परंतु अशा परिस्थितीत **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु. १००/- च्या मुद्रांकावर खालील मुद्यांचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र.**

(१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे.

(२) **स्वातंत्र्यसैनिकाने या सवलतीचा उपयोग यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी केलेला नाही** आणि आता उपयोग केल्यानंतर तो पुढे करणार नाही.

वरील मुद्यांसंबंधात काही शंका, तक्रारी, अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी प्रचलित शासन निर्णयाचा संदर्भ घ्यावा.

(एन्) **विद्यार्थी कल्याण अधिकारी / कार्यक्रम समन्वयक यांनी दिलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमाणपत्र.**

(ओ) **उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास** तशा आशयाचे **जिल्हा सैनिक बोर्ड किंवा संबंधित तुकडीचा प्रमुख सेनाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** अथवा **डिस्चार्ज प्रमाणपत्र.**

(पी) **सेवेत असणा-या उमेदवारांसाठी संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे चालू शैक्षणिक वर्षासाठीचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.**

(क्यु) **महाराष्ट्र राज्यातील उमेदवार अथवा त्याचे/तिचे पालकांचे व बाहेरील राज्यातील विद्यार्थ्यांसाठीसुध्दा सक्षम प्राधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र.**

(आर) शारीरिकदृष्टया अपंगत्व प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने **प्राधिकृत अधिका-याचे** (जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळ) **अपंगत्वाबद्दलचे प्रमाणपत्र** जोडावे.

(एस) अनाथ प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने, आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे 'अनाथ प्रमाणपत्र'.

३.४ **सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेस किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेला अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.**

३.५ **स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.**

उक्त अपलोड केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत **परिशिष्ट 'बी'** येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करावे.

३.६ **खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्ज रद्द करण्यात येईल.**

(अे) (i) **महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखल्याची स्वयंसाक्षांकित प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

**(ii) बाहेरील राज्यातील उमेदवारांनी अधिवास प्रमाणपत्र जोडले नसल्यास.**

(बी) **उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे <u>सध्याचे छायाचित्र</u> व स्वतःची स्वाक्षरी** संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.

(सी) **पात्रता परीक्षेचे <u>गुणपत्रक / श्रेणीपत्रकाच्या प्रती संकेतस्थळावर अपलोड केल्या नसल्यास</u>.**

(डी) **<u>महाविद्यालय सोडल्याचा दाखला / स्थलांतराच्या दाखल्याची प्रत</u> संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास,** (उमेदवाराने या प्रवेशापूर्वी दुसऱ्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल तर त्या महाविद्यालयाने दिलेल्या बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाईल; परंतु, मूळ महाविद्यालय सोडल्याचा दाखला प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.)

(इ) सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित **<u>नियुक्ती प्राधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र'</u> संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

(एफ) **प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास.**

**(जी) संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

३.७ **पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात गुणांच्या बाबतीत बरोबरी झाल्यास गुणवत्ताक्रम (Merit Position) ठरविण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.**

(अ) महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाकडील सामायिक प्रवेश परीक्षेचे अधिकतम् गुण,

(ब) पदवी परीक्षेतील अधिकतम् सीजीपीए,

(क) पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागलेले एकूण वर्ष आणि

(ड) वयाने मोठा असलेला उमेदवार.

(उ) प्रथम ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक

३.८ **प्रवेश अर्ज व त्यासोबतची संबंधित कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर टपालाने / कुरीअरने / हातबटवडयाने कोणतीही <u>अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.</u>**

३.९ **(i) उमेदवारांनी** त्यांना पाहिजे असलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी **प्राधान्यक्रमाने अर्जामध्ये जास्तीत जास्त विकल्प नमूद करावेत.**

**(ii)** त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या सांकेतांकांचा वापर करावा.

**(iii) एकदा नमूद केलेल्या <u>विकल्पात बदल करता येणार नाही.</u>**

३.१० (i) **उमेदवाराने सर्व रकान्यांमध्ये अचूक माहिती भरावी.**

(ii) उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची **त्रुटी राहिल्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता घसरल्यास, त्याबाबत 'केटीपीएल' किंवा कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.**

३.११ अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर **गुणवत्ता यादीतील स्थान, उमेदवाराने दिलेले विकल्प, लागू असलेले आरक्षण आणि उपलब्ध जागा विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.**

३.१२ उमेदवाराने दिलेल्या **विकल्पानुसार प्रथमतः राज्यस्तरावरील ('एम' कोटा) उपलब्ध जागांमधून प्रवेशासाठी विचार केला जाईल. त्यानंतर विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) जागांवरील प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल.**

३.१३ प्रवेशासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची 'एम्' कोटा व 'यु' कोटयातील गुणानुक्रमे यादी प्रवेश वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकांना **maha-agriadmission.in** & **www.mcaer.org** या संकेतस्थळांवर प्रकाशित केली जाईल.

३.१४ प्रवेश घेण्यास 'उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना' **'परिशिष्ट सी'** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

३.१५ शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०११/(१०३) /११)/ मशि-३, दि.१८/४/२०११ नुसार उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी स्वच्छताविषयक बाबींसबंधी **परिशिष्ट 'डी'** मध्ये माहिती देणे अनिवार्य आहे.

३.१६ शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

३.१७ प्रवेश प्रक्रियेविषयक कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.

## ४. प्रवेश कार्यपध्दती :

४.१ उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहितीपुस्तिकेत दिलेला सर्व मजकूर काळजीपूर्वक वाचावा.

४.२ कृषी परिषद, पुणे, 'केटीपीएल', पुणे यांच्यामार्फत राज्यातील कृषी विद्यापीठांकरिता प्रवेशप्रक्रिया राबवील.

४.३ महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ (क्र.४१) च्या कलम ५ मधील तरतुदीनुसार पदव्युत्तर प्रवेशासाठी इच्छुक असणारे उमेदवार आणि त्यांच्या आई/वडिलांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या १० वर्षे पूर्वीच्या कालावधीत किमान ३ वर्षे असणे

आवश्यक असून असे उमेदवार प्रवेशासाठी पात्र समजण्यात येतील; तथापि, जे उमेदवार आणि त्यांच्या आई / वडिलांचे वास्तव्य मागील १० वर्षांच्या कालावधीत तीन वर्षापेक्षा कमी असेल, असे उमेदवार राज्याबाहेरील उमेदवार म्हणून समजण्यात येतील व त्यांच्याकरिता प्रवेशांच्या जागा प्रवेश क्षमतेच्या २ टक्क्यापर्यंत मर्यादित असतील. (ही बाब मान्यताप्राप्त विना अनुदानित तत्वावरील संलग्न महाविद्यालयांसाठी लागू असणार नाही.)

४.४ भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व बाहेरील राज्यातील उमेदवारांसाठी असलेल्या राखीव जागा वगळता उर्वरित जागांपैकी-

-- **प्रथम ५० टक्के जागा महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी खुल्या असतील ('एम्' कोटा) आणि**

-- **नंतर ५० टक्के जागा, या, उमेदवार ज्या विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील महाविद्यालय/संस्था येथून अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला असेल, अशा उमेदवारांसाठी असतील ('यु' कोटा)**

४.५ **महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाकडील सामायिक प्रवेश परीक्षेतील प्राप्त गुणांच्या ७० टक्के गुण तसेच पदवी परीक्षेतील प्राप्त गुणांच्या ३० टक्के गुण आणि अधिभार- Weightages (असल्यास) या आधारे पदव्युत्तर प्रवेश होतील.**

४.६ ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवाराच्या महाविद्यालय/ शाळा सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे. मात्र त्याने पात्रता (पदवी) परीक्षा राज्याबाहेरून उत्तीर्ण केली आहे, अशा उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार **फक्त 'एम्' कोटयाकरिता करण्यात येईल.**

**४.७ सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार आणि तात्पुरत्या स्वरुपाचे असतील. संवैधानिक आरक्षण विचारात घेऊन बिंदू नामावलीद्वारे विषयांचे वाटप करण्यात येईल.**

४.८ **maha-agriadmission.in** किंवा **www.mcaer.org** **या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.** उमेदवार या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी पाहू शकतील. **उमेदवारांना टपालाद्वारे त्यांच्या गुणवत्तेबाबत कळविले जाणार नाही.**

**४.९** गुणवत्ता यादीबाबत तक्रार असलेल्या अर्जदारांनी, प्रवेश कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या दिनांकाला किंवा त्या दिनांकापूर्वी त्यांच्या तक्रारी त्यांच्या 'आयडी' व 'पासवर्ड'च्या आधारे 'ऑन लाईन'द्वारे सादर कराव्यात. **या मुदतीत उमेदवारांचा तक्रार अर्ज ऑनलाईनद्वारे प्राप्त न झाल्यास त्याचे/तिचे प्रकरण विचारात घेतले जाणार नाही.**

**४.१० उमेदवाराने त्याचा ‘लॉग इन आयडी’ व ‘पासवर्ड’ वापरून संकेतस्थळावरून त्याला देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या प्रवेश वाटप पत्राची मुद्रित प्रत प्राप्त करून घेऊन प्रवेश दिलेल्या महाविद्यालयात स्वतः सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह विहित दिनांकास अथवा त्यापूर्वी उपस्थित रहावे. गंभीर वैद्यकीय कारणास्तव उमेदवार उपस्थित राहू शकत नसल्यास परिशिष्ट- ‘ई’ येथील प्राधिकार पत्राप्रमाणे उपस्थिती नोंदवावी. अन्यथा असा उमेदवार प्रवेशासाठी अनुपस्थित राहिला असे समजण्यात येऊन त्याचा प्रवेश आपोआपच रद्द झाला आहे, असे समजण्यात येईल.**

४.११ अ) प्रवेश माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या तारखेस उमेदवाराला उपलब्ध रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

ब) **प्रवेशानंतर कोणत्याही वेळी, उमेदवाराने खोटी माहिती पुरवून प्रवेश घेतला आहे, असे आढळून आल्यास असा प्रवेश विद्यापीठ रद्द करील.**

क) एखाद्या प्रकरणी विद्यापीठाने अशी कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आल्यास असा प्रवेश रद्द करण्यासाठी महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

ड) प्रवेश फेऱ्यांच्या दरम्यान किंवा प्रवेशानंतर कोणत्याही वेळी संगणकप्रणालीमधील तांत्रिक बिघाडामुळे किंवा इतर कोणत्याही चुकीमुळे प्रवेश झाला असे आढळून आल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश महासंचालक, कृषी परिषद हे रद्द करतील.

**४.१२** (i) **उमेदवाराचा प्रवर्ग आणि / किंवा अतिरिक्त दिलेले गुण चुकीचे दर्शविले गेले असल्याचे,** प्रवेश घेतेवेळी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या **छाननीच्या वेळी निदर्शनास आल्यास, असा उमेदवार त्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळण्यास पात्र ठरणार नाही.**

(ii) सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी याबाबतची वस्तुस्थिती ‘केटीपीएल’ आणि कृषी परिषद यांना **दूरध्वनी तसेच फॅक्सद्वारे तात्काळ कळवावी.**

(iii) ‘केटीपीएल’ द्वारा अंतिम यादी पुन्हा सुधारित करण्यात येईल आणि सदर उमेदवार त्याच्या सुधारित **गुणानुक्रमानुसार प्रवेशास पात्र राहील.**

४.१३ (i) एखाद्या उमेदवाराला प्रवेशाबाबत तक्रार करायची असल्यास, **संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच कृषी परिषदेचे महासंचालक** यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल.

(ii) अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

४.१४ विविध अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश अंतिम राहील. प्रवेश घेतलेला असा उमेदवार विद्यापीठ / महाविद्यालय / अभ्यासक्रम / विषय यामध्ये कोणताही बदल करण्यास पात्र राहणार नाही.

४.१५ **कोणत्याही उमेदवाराची असा प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि पुढील प्रवेश फेरीसाठी त्याचा/तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, **संकेतस्थळावर उमेदवाराच्या लॉग-इनद्वारे डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगद्वारे रू.२००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारता येईल.**

**४.१६ एखाद्या विद्यार्थ्याने रु.२००/- फी भरुन त्याचा / तिचा प्रवेश नाकारला नाही, तर त्याचा / तिचा 'जागेवर प्रवेश फेरी' या फेरीखेरीज नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.**

**४.१७** प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश रद्द / नाकारल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द / नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रद्द करता येतील.

**४.१८ प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्काचा परतावा-**

(i) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून **प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रू.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.**

(ii) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क** (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून **वसूल करण्यात येईल.**

(iii) वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास, **नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.**

४.१९ प्रवेश प्रक्रियेसंबंधीची तसेच राज्यस्तरीय ('एम' कोटा) व विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) ची गुणवत्ता यादी आणि प्रवेश फेऱ्यांप्रमाणे प्रवेशासंबंधीची सद्यस्थिती याबाबतची माहिती **maha-agriadmission.in** व **www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

४.२० प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'एफ'** येथे दिलेल्या आहेत.

**४.२१** उमेदवाराचा दुर्लक्षितपणा, दिरंगाई, कोणत्याही प्रकारचे तांत्रिक बिघाड किंवा त्याच्या इतर खाजगी कारणांमुळे तो प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत **कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

## ५. राखीव जागांचा तपशील.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील तरतुदी, तसेच वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे विशिष्ट जागा, महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत-

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण | टक्के वारी | अ. क्र. | विशेष आरक्षण | टक्के वारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एस्सी) | १३ | (१) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्) | २.०० |
| (२) | अनुसूचित जमाती (एस्टी ) | ०७ | (२) | अपंग (कमी दिसणे, कमी ऐकणे, चालणे व्यंगत्व किंवा मणक्याचे व्यंगत्व) (पीएच) | ५.०० |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ | (३) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २.०० |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ | (४) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले. (पीएपी) महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पबाधित. | ४.०० |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ | (५) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (अेजी) | ६.०० |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) (वंजार, वंजारी, वंजारा) | ०२ | (६) | महिला उमेदवार | ३० |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) | १९ | (७) | ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्तीची व ज्याच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल अशा व्यक्ती. (ओएस्) | २.०० |
| | **एकूण** | **५०** | (८) | अनाथ मुले | १ |

**टीप :**

५.१ इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. १ ते ६ येथील विशेष आरक्षण खुला व वैधानिक आरक्षित संवर्गामध्ये समाविष्ट आहे. अ.क्र. ८ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्तेनुसार समाविष्ट राहील.

५.२ इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. ६ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग,

परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६/३/१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. प्रस्तुत शासन परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

५.३ 'विशेष मागास प्रवर्गीय' उमेदवारांची जात, सुरुवातीस ज्या 'इतर मागास प्रवर्गा'मध्ये समाविष्ट होती, त्या 'इतर मागास प्रवर्गा'च्या आरक्षणासाठी असा उमेदवार पात्र समजण्यात येईल.

५.४ महाविद्यालयनिहाय व विषयनिहाय जागांचे वाटप करण्यात येईल.

५.५ महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

५.६ प्रवेश प्रक्रियेदरम्यान एखाद्या आरक्षित संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा शासन निर्णय, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मधील कार्यपध्दतीप्रमाणे भरण्यात येतील.

## ६. अधिभार

६.१ उमेदवार प्रवेशासाठी खालील प्रमाणे अधिभार मिळण्यास पात्र राहील.

| | **१० (बिंदू मापन)** | **४ (बिंदू मापन)** |
|---|---|---|
| (१) राष्ट्रीय छात्र सेना 'बी' किंवा 'सी' प्रमाणपत्रधारक | ०.१२ | ०.०५ |
| (२) राष्ट्रीय सेवा योजना किमान २४० तास किंवा विशेष शिबीर | ०.१२ | ०.०४ |

(३) उमेदवाराने त्याच्या पदवीपूर्व शैक्षणिक कालावधीमध्ये खालील स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्यास, त्यास १०.०० बिंदु मापन पध्दतीनुसार खाली नमूद केल्याप्रमाणे अधिभार देण्यात येईल.

### <u>अधिभार गुणदान तक्ता</u>

| अ. क्र. | स्पर्धेतील स्थान | क्रीडा स्पर्धानिहाय गुणदान (सी.जी.पी.ए.) | | | मा.कुलपती यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या 'क्रीडा महोत्सव' क्रीडा स्पर्धा (अंतिम फेरी) |
|---|---|---|---|---|---|
| | | आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा | मान्यता प्राप्त संघटनेच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा | मान्यता प्राप्त संघटनेच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा | |
| (१) | प्रथम | ०.२५ | ०.२० | ०.१० | ०.१० |
| (२) | द्वितीय | ०.२० | ०.१५ | ०.०५ | ०.०५ |
| (३) | तृतीय | ०.१५ | ०.१० | ०.०३ | ०.०३ |
| (४) | सहभाग | ०.१० | ०.०५ | ०.०२ | ०.०२ |

(४) वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र. ०.१२ **पॉईंटस्**

**१० बिंदू मापनच्या (Point Scale) पध्दतीमध्ये कमाल अधिभार ०.२५ असेल.**

## ७. शिक्षण पध्दत :

- ❖ राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये 'विषय - अधिभार पध्दती'ने प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे आणि २० आठवडयांपेक्षा कमी कालावधी नसलेल्या कालावधीस 'षण्मासिक सत्र' असे म्हणतात.
- ❖ शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शिकविले जाणारे विषय निरनिराळया सत्रांमध्ये विभागले जाऊन वर्गातील व्याख्यान, प्रात्याक्षिके / शेतावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयातील वाचन व गृहपाठ इत्यादीप्रकारे शिकविले जातात.
- ❖ विद्यार्थी / विद्यार्थिनी, विषयाची निवड, घ्यावयाचे एकूण अधिभार, विद्यार्थ्याच्या सल्ला समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रचलित नियमाप्रमाणे आणि विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती पाहून करतो / करते.
- ❖ विद्यार्थ्याची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नसेल तर तो काही विषय ज्या वेळी शिकविण्यासाठी उपलब्ध असतील त्या वेळी पुन्हा घेऊ शकतो / शकते.
- ❖ शैक्षणिक नियमावलीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करून सुधारीत शैक्षणिक नियमावली तयार करण्यात येते. सुधारीत शैक्षणिक नियमावली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना लागू असते.

## ८. नोंदणी

अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था किंवा महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांनी प्रवेश अर्ज आणि मूळ प्रमाणपत्रे तपासल्यानंतर विद्यार्थ्यास नोंदणी करण्यासाठी परवानगी देण्यात येते. या नोंदणीसाठी खालील बाबींचा क्रमशः समावेश होतो.

(१) अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्थेचे कार्यालय किंवा संबंधित महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता यांच्या कार्यालयात शुल्क भरणे .

(२) सल्लागार समिती आणि विभाग प्रमुख यांच्या सल्लामसलतीने विद्यार्थ्याची विविध विषयात नोंदणी.

(३) विषय नोंदणी फॉर्म पूर्ण करुन विद्यार्थी, प्राध्यापक, मार्गदर्शक आणि विभाग प्रमुखांच्या सहीनिशी त्याच दिवशी किंवा विहीत केलेल्या वेळेपर्यंत अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था किंवा संबंधित महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांचेकडे जमा करणे. अन्यथा विद्यार्थ्याची नोंदणी अवैध ठरविली जाते.

## ९. वैद्यकीय तपासणी

- प्रथम वर्षात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ / सहयोगी अधिष्ठाता यांचे निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक / ग्रामीण वैद्यकीय अधिकारी / प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांच्याकडून पहिले सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे.
- वैद्यकीय तपासणीत विद्यार्थ्यामध्ये व्यंग आढळून आल्यास महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता संबंधित विद्यार्थ्यास आणि त्याच्या आई - वडील / पालक यांना वैद्यकीय सुधारणेसाठी कळवतील.
- **विद्यार्थी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास त्यास विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल.**
- अशी प्रकरणे कुलसचिव यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.
- विद्यापीठ/ सहयोगी अधिष्ठाता यांनी आयोजित केलेल्या वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्याला स्वखर्चाने प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन तपासणी अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालयास सुपूर्द करावा लागेल.
- **एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, तर अशा विद्यार्थ्याचा निकाल घोषित केला जाणार नाही.**

## १०. उपस्थिती

- प्रत्येक विद्यार्थ्यास वर्गात, प्रात्यक्षिक , ग्रंथालयातील काम, विस्तार शिक्षण संबंधी भेटी, शैक्षणिक सहली आणि प्राध्यापक व संबंधीत शिक्षक यांच्या बैठकीस हजर राहाणे आवश्यक आहे.
- **एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ८० टक्यापेक्षा कमी असल्यास त्याला त्या सत्राची परीक्षा देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल** व त्या विषयात अनुत्तीर्ण असा शेरा दिला जाईल (एफ् ग्रेड).
- अशा विद्यार्थ्यास त्या विषयासाठी पुन्हा नोंदणी करावी लागेल.

## ११. खेळ आणि इतर कार्यक्रम

प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा आणि त्यासंबंधी कार्यक्रम राबविण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

## १२. वसतीगृह

काही मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांकडे वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे. वसतीगृहाची सुविधा गुणवत्तेवर आधारीत आहे.

**१३. पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके.**

उच्चत्तम गुणवत्ताधारक पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके देण्यात येतात.

**१४. शिष्यवृत्ती आणि सवलती.**

कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम व्यावसायिक म्हणून घोषित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ज्या शैक्षणिक सवलती / शिष्यवृत्ती / शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती देण्यात येतात, त्या सवलती कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहणार नाहीत.

तथापि, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.७/१०/२०१७ अन्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आली असून या अंतर्गत कृषी विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

**१५. वर्तणूक आणि शिस्त**

(१) विद्यापीठामध्ये वेळोवेळी सुधारित व अस्तित्वात असलेल्या नियम व विनियमानुसार कॉपी प्रकरणे आणि गैरवर्तणुकीची प्रकरणे हाताळली जातात.

(२) विद्यापीठ संवैधानिक नियमावली, १९९० मध्ये केलेल्या तरतुदीन्वये **महाविद्यालयातील विद्यार्थी, रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास त्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता पूर्वसूचना न देता महाविद्यालयातून तसेच वसतिगृहातून ताबडतोब निलंबित करतील** आणि अशा विद्यार्थ्यास उप महासंचालक (शिक्षण), पत्र क्र. ६(२३)/२००७ ए व पी. दि.१८/१/०८ नुसार **मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष याचिका अपील (सी) (सन २००४ चे (सी) [२४२९५ व २४२९६-९९] मध्ये दि. १०/१२/२००१ रोजी दिलेले आदेश** आणि डॉ.राघवन समितीच्या अहवालाच्या आधारे (डी.क्र. ३७०/०४/XI-अे, दि.२६/०२/२००९) व कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. अेजीयु-२००९/प्र.क्र.५८/७-अे, दि.६/५/२००९ नुसार, **माननीय कुलगुरु यांच्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.**

(३) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने केलेल्या नियम व विनियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

(४) **कोणत्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही 'उच्च शिक्षण संस्थांमधील होणा-या रॅगिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदान अयोगाचे विनियमन,२००९' च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते.**

(५) रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४ X ७ रॅगिंगविरोधी कायदेशीर मदत मिळण्यासाठी **१८००-१८०-५५२२** या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ई-मेलः'**helpline@antiragging.net**' आणि संकेतस्थळ : '**http://www.ugc.ac.in**'

(६) प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई-वडील / पालक यांनी **'उच्च शिक्षण संस्थांमधील होणा-या रॅगिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदान अयोगाचे विनियमन,२००९'** मधील तरतुदींचे आम्ही पालन करू,' असे '**परिशिष्ट जी** ' येथील प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे आहे. तसेच आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणूक चांगली ठेऊ अशीदेखील खात्री देणे आवश्यक आहे.

## १६. शुल्क

**पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी भरावयाच्या शुल्काचा तपशील (रुपयांमध्ये).** प्रस्तुत शीर्षांतर्गत दर्शविण्यात आलेले शुल्क हे कृषी परिषदेच्या मान्यतेनुसार बदलण्यात येईल.

| अ. क्र. | बाब | पदव्युत्तर पदवी | | एम्.बी.ए. (कृषी) / एम्.एस्.सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ ले सत्र | २ रे सत्र | १ ले सत्र | २ रे सत्र |
| | **अ) महाविद्यालय शुल्क** | | | | |
| १ | घटक / अनुदानित महाविद्यालयांकरिता शैक्षणिक शुल्क | ८०००<br>२५००० €<br>१२५००० £ | ८०००<br>२५००० €<br>१२५००० £ | ७५००<br>१५००० ¥,<br>२५०० ®<br>२५००० §<br>२०००० §§ | ७५००<br>१५००० ¥,<br>२५००®<br>२५००० §<br>२०००० §§ |
| | विना अनुदानित तत्वावरील अभ्यासक्रमाकरिता शैक्षणिक शुल्क | | | २०००० ۞<br>५०००० ♂ | २०००० ۞<br>५०००० ♂ |
| २ | नोंदणी शुल्क | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| ३ | पात्रता शुल्क # | ५००<br>८०० ⊗ | -- | ५००<br>८०० ⊗ | -- |
| ४ | महाविद्यालय हमी शुल्क | २०००© | -- | २०००© | -- |
| ५ | ग्रंथालय शुल्क | १००० | १००० | १००० | १००० |

| अ. क्र. | बाब | पदव्युत्तर पदवी | | एम्.बी.ए. (कृषी) / एम्.एस्.सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ ले सत्र | २ रे सत्र | १ ले सत्र | २ रे सत्र |
| ६ | विद्यार्थी कल्याण निधी | | | | |
| | १) खेळ,जिमखाना व इतरगतीविधी | १००० | १००० | १००० | १००० |
| | २) विद्यार्थी सहकारी संस्था (भांग भांडवल + सभासद शुल्क) | २०० # | -- | २०० # | -- |
| | ३) स्नेह संम्मेलन | ८०० | -- | ८०० | -- |
| | ४) महाविद्यालय नियतकालीक | ४०० | -- | ४०० | -- |
| | ५) 'क्रीडा महोत्सव' क्रीडा शुल्क | १०० | -- | १०० | -- |
| ७ | विद्यापीठ वैद्यकीय तपासणी शुल्क | २०० | -- | २०० | -- |
| ८ | ओळख पत्र | १०० # | -- | १०० # | -- |
| ९ | विद्यार्थी कल्याण निधी | २०० # | -- | २०० # | -- |
| १० | गुण पत्रिका शुल्क | २०० | २०० | २०० | २०० |
| ११ | परीक्षा शुल्क | ३५०० | -- | ३५०० | -- |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १०० | -- | १०० | -- |
| १३ | प्रबंध तपासणी शुल्क | -- | २००० | -- | २००० |
| | एकूण (अ) | १८८०० +<br>[३०० ⊗<br>१७००० €<br>११७००० £] | १२७०० +<br>[१७००० €<br>११७००० £] | १८३०० +<br>[ ७५०० ¥ /<br>३०० ⊗ /<br>(-) ५००० ® /<br>१२५०० ۞ /<br>४२५०० ♂ /<br>१७५०० § /<br>१२५०० §§] | १२२०० +<br>[ ७५०० ¥ /<br>(-) ५००० ® /<br>१२५०० ۞ /<br>४२५०० ♂ /<br>१७५०० § /<br>१२५०० §§] |
| | **(ब) वसतीगृह** | | | | |
| १ | वसतीगृह हमी रक्कम | ३०००© | -- | ३०००© | -- |
| २ | देखभाल खर्च | ३००० | ३००० | ३००० | ३००० |
| ३ | विद्युत देयक | ३००० | ३००० | ३००० | ३००० |
| ४ | खाणावळ अनामत रक्कम | २०००© | -- | २००० | -- |
| | एकूण (ब) | ११००० | ६००० | ११००० | ६००० |
| | एकूण (अ+ब) | ३१४८६+<br>[३०० ⊗<br>१७००० €<br>११७०००£] | ७३०० +<br>[१७००० €<br>११७०००£] | २९३०० +<br>[ ७५०० ¥ /<br>३०० ⊗ /<br>(-) ५००० ® /<br>१२५०० ۞ /<br>४२५०० ♂ /<br>१७५०० § /<br>१२५०० §§] | १८२०० +<br>[ ७५०० ¥ /<br>(-) ५००० ® /<br>१२५०० ۞ /<br>४२५०० ♂ /<br>१७५०० § /<br>१२५०० §§] |

⊗ पात्रता परीक्षा महाराष्ट्र राज्याबाहेरून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे शुल्क.

© विद्यार्थ्यांनी महाविद्यालय / वसतीगृह सोडतांनाचे परतावा शुल्क.

# हे शुल्क विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन काळात एकदाच भरावयाचे आहे.

¥ वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमास राज्य/विद्यापीठस्तरीय प्रवेशपरीक्षेद्वारे प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क.

® वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमास राष्ट्रीय स्तरावरील प्रवेशफेरीद्वारे किंवा जैवतंत्रज्ञान विभाग, भारत सरकार प्रायोजित कार्यक्रमातंर्गत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क.

۞ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) करिता शुल्क.

♂ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे व तळेगाव दाभाडे जि.पुणे येथील एम्.बी.ए. (कृषी) व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी महाविद्यालय, नागपूर येथील एम्.बी.ए. (कृषी) करिता शुल्क.

§ वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर येथील एम्.बी.ए. (कृषी) अभ्यासक्रमास मुलांकरिता शुल्क.

§§ वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर येथील एम्.बी.ए्. (कृषी) अभ्यासक्रमास मुलींकरिता शुल्क.

€ डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत काढणी पश्चात व्यवस्थापन महाविद्यालय, दापोली येथील एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) अभ्यासक्रमास गुणवत्तेवर आधारीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांकरिता शुल्क.

£ डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत काढणी पश्चात व्यवस्थापन महाविद्यालय, दापोली येथील एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) अभ्यासक्रमाकरिता पुरस्कृत उमेदवारांकरिता शुल्क.

**टिप** -

१. गुणपत्रिका / परीक्षा शुल्क संबंधित विद्यापीठात जमा करावे.

२. एकत्रित श्रेणीपत्रक / गुणपत्रक शुल्क रु. १००/- इतके शेवटच्या सत्राच्या नोंदणीच्या वेळी ज्या त्या विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

३. महाराष्ट्र शासनाच्या सवलतीच्या नियमाप्रमाणे विद्यार्थीनी आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणा-या सवलती या राज्य शासनाच्या वेळोवेळी सुधारित नियमाप्रमाणे दिल्या जातील.

## शुल्काचा गोषवारा

| अ. क्र. | बाब | पदव्युत्तर पदवी | | एम्.बी.ए. (कृषी) / एम्.एस्.सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ ले सत्र | २ रे सत्र | १ ले सत्र | २ रे सत्र |
| | **अ) महाविद्यालय शुल्क** | | | | |
| १. | घटक / अनुदानित महाविद्यालयांकरिता शुल्क. | १८८०० | १२७०० | १८३०० | १२२०० |
| २. | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत काढणी पश्चात व्यवस्थापन महाविद्यालय, दापोली येथील एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) अभ्यासक्रमास गुणवत्तेवर आधारीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांकरिता शुल्क. | ३५८०० | २९७०० | -- | -- |
| ३. | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत काढणी पश्चात व्यवस्थापन महाविद्यालय, दापोली येथील एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) अभ्यासक्रमाकरिता पुरस्कृत उमेदवारांकरिता शुल्क. | १३५८०० | १२९७०० | -- | -- |
| ४. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमास राज्य/विद्यापीठस्तरीय प्रवेशपरीक्षेद्वारे प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क. | -- | -- | २५८०० | १९७०० |
| ५. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमास राष्ट्रीय स्तरावरील प्रवेशफेरीद्वारे किंवा जैवतंत्रज्ञान विभाग, भारत सरकार प्रायोजित कार्यक्रमातंर्गत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क. | -- | -- | १३३०० | ७२०० |
| ६. | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) करिता शुल्क. | -- | -- | ३०८०० | २४७०० |
| ७. | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे व तळेगाव दाभाडे, जि.पुणे येथील एम्.बी.ए. (कृषी) व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी महाविद्यालय, नागपूर येथील एम्.बी.ए. (कृषी) करिता शुल्क. | -- | -- | ६०८०० | ५४७०० |

| अ. क्र. | बाब | पदव्युत्तर पदवी | | एम्.बी.ए. (कृषी) / एम्.एस्.सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ ले सत्र | २ रे सत्र | १ ले सत्र | २ रे सत्र |
| ८. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर येथील एम्.बी.ए. (कृषी) अभ्यासक्रमास मुलांकरिता शुल्क. | -- | -- | ३५८०० | २९७०० |
| ९. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर येथील एम्.बी.ए. (कृषी) अभ्यासक्रमास मुलींकरिता शुल्क. | -- | -- | ३०८०० | २४७०० |
| | **(ब) वसतीगृह शुल्कासह महाविद्यालयाचे शुल्क** | | | | |
| १. | घटक / अनुदानित महाविद्यालयांकरिता शुल्क. | ३१४८६ | १८७०० | २९३०० | १८२०० |
| २. | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत काढणी पश्चात व्यवस्थापन महाविद्यालय, दापोली येथील एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) अभ्यासक्रमास गुणवत्तेवर आधारीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांकरिता शुल्क. | ४८४८६ | ३५७०० | -- | -- |
| ३. | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठांतर्गत काढणी पश्चात व्यवस्थापन महाविद्यालय, दापोली येथील एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) अभ्यासक्रमाकरिता पुरस्कृत उमेदवारांकरिता शुल्क. | १४८४८६ | १३५७०० | -- | -- |
| ४. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमास राज्य/विद्यापीठस्तरीय प्रवेशपरीक्षेद्वारे प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क. | -- | -- | ३६८०० | २५७०० |
| ५. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमास राष्ट्रीय स्तरावरील प्रवेशफेरीद्वारे किंवा जैवतंत्रज्ञान विभाग, भारत सरकार प्रायोजित कार्यक्रमातंर्गत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क. | -- | -- | २४३०० | १३२०० |
| ६. | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) करिता शुल्क. | -- | -- | ४१८०० | ३०७०० |

| अ. क्र. | बाब | पदव्युत्तर पदवी | | एम्.बी.ए. (कृषी) / एम्.एस्.सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) | |
|---|---|---|---|---|---|
| | | १ ले सत्र | २ रे सत्र | १ ले सत्र | २ रे सत्र |
| ७. | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे व तळेगाव दाभाडे, जि.पुणे येथील एम्.बी.ए. (कृषी) व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी महाविद्यालय, नागपूर येथील एम्.बी.ए. (कृषी) करिता शुल्क. | -- | -- | ७१८०० | ६०७०० |
| ८. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर येथील एम्.बी.ए. (कृषी) अभ्यासक्रमास मुलांकरिता शुल्क. | -- | -- | ४६८०० | ३५७०० |
| ९. | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी महाविद्यालय, लातूर येथील एम्.बी.ए्. (कृषी) अभ्यासक्रमास मुलींकरिता शुल्क. | -- | -- | ४१८०० | ३०७०० |

## १७. प्रवेश कार्यक्रम

१७.१ पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे सन २०१८-१९ साठीचे वेळापत्रक.

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | प्रवेश प्रक्रियेस सुरुवात दिनांक | ३०/०७/२०१८ |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | ०९/०८/२०१८ |
| ३. | 'केटीपीएल' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १३/०८/२०१८ (सायंकाळनंतर) |
| ४. | तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक | १४/०८/२०१८ ते १६/०८/२०१८ |
| ५. | 'केटीपीएल' व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २०/०८/२०१८ (सायंकाळनंतर) |
| ६. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २३/०८/२०१८ (सायंकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | २६/०८/२०१८ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | २८/०८/२०१८ (सायंकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ३०/०८/२०१८ (सायं. ५.३० पर्यंत) |

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| ८. | रिक्त जागांच्या यादीची प्रसिध्दी | ३१/०८/२०१८ |
| ९. | जागेवर प्रवेश फेरी (**परिशिष्ट 'एच '** येथील कार्यपध्दतीनुसार) | ०१/०९/२०१८ आणि ०२/०९/२०१८ |
| १०. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ३१/०८/२०१८ |

**टीप** -

(१) **रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी महाविद्यालयस्तरावर प्रवेश प्रक्रियाविषयक कार्यवाही चालू राहील.**

(२) तिस-या प्रवेश फेरीनंतर विविध कारणामुळे जागा रिक्त असल्यास त्या जागा 'जागेवर प्रवेश फेरी'तून संबंधित महाविद्यालय / संस्था यांच्यास्तरावर 'केटीपीएल' यांनी प्रसिध्द केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीतून भरण्यात येतील.

(३) वर अधिसूचित केल्याप्रमाणे प्रवेश प्रक्रियेकरिता वेगळे मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.

१७.२ या माहीती पुस्तिकेमध्ये विविध पदव्युत्तर प्रवेशाचे नियम तसेच शैक्षणिक नियमावलीच्या सर्व अभ्यासक्रमाची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. सविस्तर माहितीसाठी प्रवेशाचे नियम व विनियम तसेच शैक्षणिक नियमावली पहावी.

१८. 'केटीपीएल' **चे संकेतस्थळ maha-agriadmission.in दि. ३० जुलै,२०१८ पासून कार्यरत राहील.**

**(सचिन्द्र प्रताप सिंह)**
**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे-४११ ००७.**

## प्रवेशाकरिता तपासावयाच्या कागदपत्रांची सूची

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (×) |
|---|---|---|
| (१) | (i) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला. | |
| | (ii) बाहेरील राज्यातील उमेदवारांचे अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / जात, मूळ रहिवास व जन्मदाखला. | |
| (२) | **अर्हता परीक्षेचे गुणपत्रक किंवा श्रेणीपत्रक**. | |
| (३) | **महाविद्यालय सोडल्याचे / महाविद्यालय बदलीचे प्रमाणपत्र** (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड** प्रमाणपत्र. | |
| (४) | राज्यातील पदनिर्देशित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले **'जात प्रमाणपत्र.'** | |
| (५) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग या उमेदवारांचे **जात वैधता प्रमाणपत्र. /** जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती. | |
| (६) | दि. **१ एप्रिल,२०१८ किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दाखल केला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र / उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे **(Non Creamy Layer)** प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती. | |
| (७) | (अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.** | |
| | (ब) **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती/पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावरील प्रतिज्ञापत्र.** | |
| | (क) असल्यास, खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत काय? | |
| | (१) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी आहे. | |
| | (२) स्वातंत्र्य सैनिकाने यापूर्वी कोणत्याही नातेवाईकासाठी ही सवलत घेतलेली नाही. | |
| | (३) यावेळी लाभ मिळाल्यास, यानंतर स्वातंत्र्य सैनिक कोणत्याही अन्य नातेवाईकासाठी ही सवलत घेणार नाही. | |

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (×) |
|---|---|---|
| (८) | **संरक्षण दलातील कर्मचारी** असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र** किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| (९) | सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.'** [**विकलांगतेची टक्केवारी** शारिरीकदृष्टया अपंग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्याच्या बाबतीत, **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.**] | |
| (१०) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** | |
| (११) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यामध्ये / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये सन २०१६-१७ किंवा २०१७-१८ या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| (१२) | पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीमधील राष्ट्रीय छात्रसेनेचे (एनसीसी) 'ब' प्रमाणपत्र किंवा समादेशक अधिकाऱ्याचे (वायु /नौसेना / सैन्यदल) प्रमाणपत्र (पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीतील) असावे. | |
| (१३) | (अ) 'क्रीडा महोत्सव' क्रीडा / खेळ स्पर्धामध्य (आंतरमहाविद्यालयीनस्तरीय स्पर्धा वगळता) भाग घेणा-या उमेदवारांनी सादर केलेले विद्यार्थी कल्याण अधिकारी / कृषी विद्यापीठाचे कुलगुरु / आयोजक विद्यापीठांचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र. | |
| | (ब) आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांबाबत महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना / भारतीय ऑलिंम्पिक संघटना मान्यताप्राप्त क्रीडा संघटनेच्या संयोजन समितीच्या सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र. | |
| | (क) आंतरराष्ट्रीय अजिंक्य क्रीडा स्पर्धा- (i) ऑलिम्पिक गेम्स. (ii) कॉमनवेल्थ गेम्स. (iii) कॉमनवेल्थ युथ गेम्स. (iv) आशियाई क्रीडा स्पर्धा. | |

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (×) |
|---|---|---|
| (१४) | **पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीमध्ये** वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या **राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. | |
| (१५) | विद्यार्थी कल्याण अधिकारी / कार्यक्रम समन्वयक यांचे **राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमाणपत्र** असावे. (किमान २४० तास काम केलेले / विशेष शिबीर केलेले). | |
| (१६) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **चालू शैक्षणिक वर्षासाठीचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.** | |
| (१७) | संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'बी' मधील स्वयंघोषणा पत्र. | |
| (१८) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट 'डी'** मधील हमीपत्र. | |
| (१९) | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा २०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.२/४/२०१८ अन्वये आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र. | |

# परिशिष्ट 'अे'

## शेतकरी असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीमती.................................................................. (जमीन धारकाचे नांव) राहणार................. तालुका.................. जि. ........................ हे श्री./कु. ..................... ....................................... (विद्यार्थ्याचे नाव) यांचे/हिचे वडील/ आई /आजोबा /आजी (वडिलांकडून) असून श्री/श्रीमती................................................ यांच्या नांवे ............ हे. ...........आर इतकी शेतजमीन आहे. ही जमीन .......................................... अधिनियम,* १९............ चे कलम ............. मधील तरतुदीनुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही. असेही प्रमाणित करण्यात येते की, त्यांचे उत्पनांचे मुख्य साधन त्यांच्या नांवे असलेल्या शेतजमिनीतून आहे.

ठिकाण - स्वाक्षरी
दिनांक - नांव
कार्यालयीन मोहर पदनाम

..................................................................................................................................

**टीप** (१) * येथे संबंधित अधिनियमाचे पूर्ण नाव द्यावे.
(२) स्वाक्षरी व कार्यालयीन मोहर ही अधिकृत अधिका-याचीच असावी.
(३) 'शेतकरी' म्हणजे अशी व्यक्ती की, जिच्या नावे असलेली शेतजमीन संबंधित महसुली विभागाच्या जमीन अधिनियमानुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही.
(४) विद्यार्थी स्वतः जमीन मालक असल्यास जमीनधारकाचे नांव त्याचेच राहील.

## परिशिष्ट 'बी'

## 'स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रतींविषयी स्वयं घोषणापत्र'

| |
|---|
| अर्जदाराचा फोटो |

मी ....................................... श्री. ................................ यांचा मुलगा / मुलगी वय ........... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .............. व्यवसाय ................ राहणार ................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती खऱ्या आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- ............... अर्जदाराची सही ......................

दिनांक :- ............... अर्जदाराचे नावः.......................

## <u>परिशिष्ट 'सी'</u>

## <u>'उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना'</u>

(१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी **<u>maha-agriadmission.in</u>** या संकेतस्थळावर **'Application Flow Chart'** या शिर्षाद्वारे दर्शविण्यात आलेल्या प्रवेश पध्दतीच्या टप्प्यांचे अवलोकन करावे.

(२) प्रवेश माहिती पुस्तिकेमधील मुद्दा क्र. १७ येथे नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे नीट आकलन करावे.

(३) प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः ऑनलाईन असल्याने **www.mcaer.org** किंवा **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर उमेदवाराने प्रवेश अर्जाद्वारे वैयक्तिक व शैक्षणिक माहिती भरावी.

(४) संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात. मे. केटीपीएल, पुणे यांच्या अधिकृत केंद्रांवर एक कागदपत्र स्कॅन करण्यासाठी रू.५/- शुल्क आकारण्यात येईल. अशा अधिकृत केंद्रांची यादी **'maha-agriadmission.in'** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(५) स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.

(६) **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व उमेदवारांसाठी रु.१५००/- तर महाराष्ट्रातील आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.७५०/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

(७) उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावे.

(८) प्रवेश अर्जामधील माहिती योग्य असल्याची, त्याप्रमाणे कागदपत्रे अपलोड केल्याची व प्रवेश शुल्क भरल्याची खातरजमा झाल्यानंतरच प्रवेश अर्ज दाखल करण्याचे बटन दाबावे. एकवेळा दाखल झालेल्या प्रवेश अर्जामध्ये दुरस्त्या / सुधारणा करता येणार नाहीत. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

(९) (अ) अंतरिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर आपले नाव, प्रवर्ग, गुण, अधिभार इत्यादी माहिती अचूक आहे, याची संकेतस्थळाद्वारे खातरजमा करावी.

(ब) माहितीमध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्यास, पुराव्यादाखल कागदपत्राचे स्कॅन करून अशा स्कॅन कागदपत्रांसह वेळापत्रकात दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवाराने आपल्या 'लॉग-इन आय्डी' व 'पासवर्ड'च्या आधारे त्रुटीची ऑन लाईन पूर्तता करावी.

(१०) (अ) वेळापत्रकात नमूद केलेल्या दिनांकास प्रसिध्द केलेल्या महाविद्यालयनिहाय 'प्रवेश यादी'चे अवलोकन करावे.

(ब) **'वाटप यादी'मध्ये नाव असलेल्या उमेदवाराने आपल्या 'लॉग-इन आयडी'द्वारे 'तात्पुरते प्रवेश वाटपपत्र' (Provisional Allotment Letter) प्राप्त करून घ्यावे.**

**(११)** (अ) ज्या उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा उमेदवारास प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याने संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व आवश्यक त्या शुल्कासह संबंधित महाविद्यालयामध्ये, वाटपपत्रावर **(Provisional Allotment Letter)** नमूद केलेल्या **अंतिम दिनांकापर्यंत विहित वेळेत उपस्थित रहावे.**

(ब) अशा उमेदवाराकडील आवश्यक ती मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडून तपासण्यात येतील व योग्य असल्यास उमेदवाराचा प्रवेश निश्चित करतील.

**(१२)** (अ) प्रवेश घ्यावयाचा असल्यास उमेदवाराने नियमानुसार शुल्क व आवश्यक ती मूळ कागदपत्रे महाविद्यालयात जमा करावीत.

**(ब) ज्या उमेदवारांना शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांनी शुल्क भरु नये.**

(क) प्रवेश घ्यावयाचा नसल्यास, **संकेतस्थळावर उमेदवाराच्या लॉग-इनद्वारे डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगद्वारे रू.२००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारता येईल.**

**(१३)** (अ) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास संबंधित **महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यामध्ये प्रवेश रद्द करण्याबाबत विनंती अर्ज सादर करावा.**

(ब) अशाप्रकरणी **प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१८ नुसार आवश्यक ते शुल्क व मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडून परत घ्यावीत.**

(१४) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत त्यास प्रवेश मिळू शकतो. मात्र उमेदवाराने अशाप्रसंगी एखाद्या व्यक्तीस स्वतःच्या स्वाक्षरीने प्राधिकृत करणे आवश्यक आहे. प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकार पत्रासोबत उमेदवाराचे तात्पुरते वाटपपत्र, उमेदवाराची सर्व मूळ कागदपत्रे, संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र आणि आवश्यक ते शुल्क सोबत आणावे. प्राधिकार पत्राचा विहित नमुना **परिशिष्ट 'ई'** येथे देण्यात आला आहे. ही बाब, जागेवरील प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

**(१५)** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना मूळ कागदपत्रांच्या आधारे उमेदवारांने योग्य माहिती प्रवेश अर्जात द्यावी. चुकीची माहिती दिल्यास अशा चुकीच्या माहितीच्या आधारे झालेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

**(१६)** ज्या विद्यार्थ्यांना स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दान करावयाचे आहेत. त्यांनी परिशिष्ट 'आय' येथील 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज' भरून महाविद्यालयाकडे द्यावा.

(१७) अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'बी' येथील नमुन्यात स्वयंघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करणे अनिवार्य आहे.

(१८) शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण - १५१७ / प्र.क्र.१८५ / ६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

-------------------

## परिशिष्ट 'डी '

**प्रवेश घेताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांना असणा-या स्वच्छताविषयक सवयी तसेच त्यांच्या घरी असणा-या स्वच्छता विषयक सुविधांची माहिती भरण्याचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १ | नाव | .............................................................................. |
| २ | कायम रहिवासाचा पत्ता | ..............................................................................<br>.............................................................................. |
| ३ | कुटुंबाची माहिती | कुटुंबातील सदस्यांची संख्या-<br>शौचालय वापर करणा-यांची संख्या- |
| ४ | शौचालयाची उपलब्धता | आहे ☐ नाही ☐<br>शौचालयाची उपलब्धता नसल्यास कारण-<br>.............................................................................. |
| ५ | हात धुण्याची सवय | जेवणापूर्वी- आहे ☐ नाही ☐ |
| | | असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| | | शौचानंतर- आहे ☐ नाही ☐ |
| | | असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| ६ | वचननामा | शौचालयाची आवश्यकता व त्याचा सातत्याने वापर करण्याबाबतचे संस्थेने केलेले आवाहन मी वाचले व त्याबाबतचे महत्व मला मनापासून पटले आहे. मी याचे महत्व माझ्या घरातील सर्वांना समजावून सांगून **येत्या तीन महिन्यात** माझ्या घरी शौचालय बांधेन व सर्व जण त्याचा नियमित वापर करण्याचे वचन मी संस्थेस देत आहे. |

दिनांक :-

स्वाक्षरी-

## परिशिष्ट 'ई'

## प्राधिकार पत्र

मी खाली सही करणार श्री./श्रीमती. ................................ .......................... ......... ....... प्रवेश अर्ज क्र........................, पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ अंतर्गत दि..................... ते दि. ................... या कालावधीतील ................ प्रवेश वाटप फेरीद्वारे मला तात्पुरते वाटप पत्र प्राप्त झाले आहे.

मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, मला दि. ..................... पासून ................................................................................. (रूग्णालयाचे नाव व पत्ता) या रूग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे आणि .............................. ....................................................... (महाविद्यालयाचे नाव व पत्ता) महाविद्यालयामध्ये सदर वाटप फेरीस उपस्थित राहण्यास मी शारीरिकदृष्टया सक्षम नाही.

यास्तव माझा / माझी ....................... (नाते) श्री. / श्रीमती ................. .................. .................. यांना वरील वाटप फेरीस उपस्थित राहण्याकरिता मी प्राधिकृत करीत आहे. त्यांनी माझ्या समक्ष खाली स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्याकडे त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्रसुध्दा (photo identity) आहे.

आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्र, इतर कागदपत्रे व शुल्क मी त्यांच्याकडे सुपूर्द केलेले आहे.

परवानगी आणि विचार होण्यासाठी विनंती आहे.

**आपला,**

**नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी व नाव**

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

प्रति,

सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य,
......................................................
......................................................
......................................................

## परिशिष्ट ‘एफ’

## 'प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालयांच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना'

(१) वाटपपत्रावर नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत उमेदवार वाटप पत्र घेऊन आल्यानंतर, वाटप पत्रामध्ये नमूद केलेला उमेदवाराचा प्रवर्ग, गुण, महाविद्यालय सोडल्याचा दाखला / स्थलांतराचा दाखला इत्यादीविषयक सर्व मूळ कागदपत्रे तपासावीत.

(२) (अ) आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्यास उमेदवाराकडून नियमानुसार शुल्क भरुन प्रवेशाची नोंदणी करावी.

(ब) महाविद्यालयाच्या ‘लॉग इन’द्वारे संकेतस्थळावर प्रवेश दिल्याची नोंद करून ’केटीपीएल’कडे कळवावी.

(क) **ज्या उमेदवारांसंदर्भात शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांकडून शुल्क वसूल करू नये.**

(३) प्रवेशाची नोंदणी झाल्यानंतर विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करावयाचा असल्यास प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१९ येथे नमूद केलेल्या पध्दतीने कार्यपध्दती अवलंबावी आणि महाविद्यालयाच्या ‘लॉग इन’द्वारे नोंद करून ’केटीपीएल’ला आणि फॅक्सद्वारे संचालक (शिक्षण), कृषी परिषद यांना कळवावे.

(४) प्रवेश देतेवेळी उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करू न शकल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश फेटाळण्यात (Reject) यावा आणि लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून प्रवेश फेटाळण्याचे कारण संकेतस्थळावर नमूद करण्यात यावे.

(५) प्रवेश फे-या सुरु झाल्यानंतर किमान पाच महिन्यांपर्यंत सर्व महाविद्यालयांनी लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करत रहावी.

(६) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी / प्रवेश नाकारण्यासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकृत पत्रासोबत संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र, तात्पुरते वाटपपत्र, आवश्यक ती मूळ कागदपत्रे व योग्य ते शुल्क सादर केल्यास उमेदवारास त्याच्या गैरहजेरीत प्रवेश देण्यात यावा / प्रवेश नाकारण्यात यावा. ही बाब, जागेवरील प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

(७) मरणोत्तर अवयवदान करण्याविषयी विद्यार्थ्याची संमती असल्यास महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी अशा विद्यार्थ्यांकडून परिशिष्ट ‘आय’ येथील ‘मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज’ भरून घ्यावा व महाविद्यालय ओळखपत्रावर ‘अवयवदाता’ अशी नोंद करावी.

(८) ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी उमेदवाराकडून हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून घेऊन शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार कार्यवाही करावी.

---------------------------

# <u>परिशिष्ट ‘जी ’</u>

## AFFIDAVIT BY THE STUDENT

I, <u>*(full name of student with admission / registration / enrolment number)*</u> s/o d/o Mr./Mrs./Ms. ______________________________, having been admitted to ____________*(name of the institution)* __________, have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the ‘’Regulations’’) carefully read and fully understood the provisions contained in the said Regulations.

2) I have, in particular, perused clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administrative action that is liable to be taken against me in case I am found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of a conspiracy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) I will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

b) I will not participate in or abet or propagate through any act of commission of omission that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, I am liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against me under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that I have not been expelled or debarred from admission in any institution in the country on account of being found guilty of abetting or being part of a conspiracy to promote, ragging; and further affirm that, in case the declaration is found to be untrue, I am aware that my admission is liable to be cancelled.

Declared this ______ day of _____________ month of ___________ year.

_________________________
Signature of deponent
Name :

VERIFICATION

Verified that the contents of this affidavit are true to the best of my knowledge and no part of the affidavit is false and nothing has been concealed or misstated therein.

Verified at <u>*(place)*</u> on this the <u>*(day)*</u> of <u>*(month), (year)*</u>.

Signature of deponent

Solemnly affirmed and signed in my presence on this the <u>*(day)*</u> of <u>*(month)*</u>, <u>*(year)* .</u> after reading the contents of this affidavit.

OATH COMMISSIONER

# परिशिष्ट 'एच'

## जागेवर प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती

जागेवरील प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. ०१ आणि ०२ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश प्रक्रिया (**Spot Admission Round**) राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा. लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्याकडून **www.mcaer.org** व **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर दि. ३१ ऑगस्ट,२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात दि. ०१ आणि ०२ सप्टेंबर,२०१८ **या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० या कालावधीत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(२) संबंधित महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी स्वतः **सकाळी १०.०० ते १३.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून ती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.**

(३) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर जागेवर प्रवेश फेरीच्या (Spot Admission Round) शेवटच्या दिवशी म्हणजेच दि. ०१ आणि ०२ सप्टेंबर,२०१८ **रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी घ्यावी.**

(४) उच्च गुणवत्ताधारक उमेदवार उशिरा हजर झाल्यास आणि त्यावेळी जागा रिक्त असल्यास, अशा **उच्च गुणवत्ताधारक उमेदवारास प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) **यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे महाविद्यालयांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावरील महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'केटीपीएल' यांची असेल.

(६) दि. ०१ आणि ०२ सप्टेंबर,२०१८ या कालावधीत दररोज सायंकाळी १६.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी.

**(७)** महाविद्यालयांनी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) व 'केटीपीएल' यांच्याकडे सायंकाळी १७.०० वाजेपूर्वी फॅक्स / ई-मेलद्वारे कळवावा.**

(८) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारास त्याच्या 'लॉग इन'मध्ये प्रशासकीय कारणास्तव **'केटीपीएल'**ने तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' उपलब्ध करून द्यावे.

(९) जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (जागेवरील प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

------------------------------

## परिशिष्ट 'आय'

## ' मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज ' (ऐच्छिक)

मी नाव श्री./श्रीमती. .................................. ........... ............ ... ................ प्रवेश अर्ज क्र......................... स्वेच्छेने लिहून देतो की, माझ्या मरणोत्तर माझे अवयव दान करण्यासंबंधी मी संमती देत आहे.

ठिकाणः

दिनांकः

स्वाक्षरी ...................................

नाव- ....................................

अर्ज क्रमांक ....................................